नगरसचिव कार्यालय

## पुणे महानगरपालिका
### महानगरपालिका सभा ठराव

| | | |
|---|---|---|
| सभा क्रमांक :- ९६ | | दिनांक :- १४/१२/२०१७ |
| विषय क्रमांक :- ६६७ | ठराव क्रमांक :- ६९३ | खाते – महापालिका आयुक्त |

संदर्भ:- १) टेंडर क्र. १०३-२०१४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७०७ दि. २/१२/२०१५
३) Innovative Transport Solutions Pvt.Ltd. (ITrans) यांना दिलेले जा.क्र.पथ/१२७ दि. ३/१२/२०१५ ची वर्कऑर्डर
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/५३३ दि.१६/११/२०१७ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१३४५, दि.२१/११/२०१७

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे शहरातील शहरी वाहतूक नियोजन यांचे सहाय्याने Non Motorized Transport (NMT) अंतर्गत तयार केलेल्या पुणे शहरातील एकात्मिक सायकल आराखड्यास (Comprehensive Bicycle Plan) तसेच या आराखड्यातील तरतुदींच्या अनुषंगाने पुणे पब्लिक बायसिकल शेअर सिस्टीम (PBS) राबविणेसाठी तयार केलेल्या धोरणास व त्या संबंधी करावयाच्या समजुतीचा मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेला करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्यात येत आहे.

१) पुणे महानगरपालिकेने तज्ञ सल्लागारांमार्फत तयार केलेल्या एकात्मिक सायकल आराखड्यास
२) सदर सायकल आराखड्यातील बाबींचे विकसनाकरिता किमान सलग ३ वर्षे पुरेशी आर्थिक अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध होणेस
३) सदर आराखड्यात दर्शविलेले सर्व सायकल मार्ग पुणे मनपाचे विकास आराखड्यात आवश्यकतेनुसार समाविष्ट करणेस
४) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलल्या पुणे पब्लिक बायसिकल शेअर (PBS) सिस्टीमच्या धोरणास
५) सदर धोरणानुसार संबंधित संस्था/चालक यांचेशी करावयाच्या समजुतीच्या करारनाम्यास व त्यानुसार त्यांचेशी पुणे महानगरपालिकेतर्फे मा.महापालिका आयुक्त यांनी समजुतीचा करारनामा करणेस

नगरसचिव
पुणे महानगरपालिका.

मुख्य अभियंता (प्र)

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्र. ३८३६ दिनांक : १५।१२।१७

O.No. 3727
14 DEC 2017